नमस्कार

डाव्या व लोकशाही आघाडीतर्फे भारतीय कम्युनिस्ट पक्ष महाराष्ट्रातून लोकसभेच्या चार जागा लढवत आहे. दक्षिण मुंबईतून कॉ. प्रकाश रेड्डी, भिवंडीतून कॉ. मधुकर पाटील, परभणीतून कॉ. राजन क्षीरसागर व गडचिरोलीतून कॉ.प्रा. नामदेव कन्नाके हे चारही उमेदवार विद्यार्थी युवक, श्रमीकांच्या चळवळीतून पुढे आलेले स्वच्छ चारित्र्याचे नेते आहेत.

निवडणुका या देशातील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आहेत पण आज दिसतय काय? तर देशापुढे आसणाऱ्या महागाई, बेकारी, विषमता, स्त्रियांवरचे अन्याय, हल्ले या प्रश्नांची चर्चा होत नाही. या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी कोणता कार्यक्रम आहे याची चर्चा होत नाही. पक्षांच्या धोरणांची चर्चा न करता व्यक्तींची चर्चा केली जात आहे केवळ व्यक्तिकेंद्रीत प्रचार होतो आहे.

भ्रष्टाचाराची चर्चा होताना दिसते. पण भ्रष्टचार हा परिणाम आहे त्याचे मूळ कारण आहे ते बाजारी अर्थव्यवस्थेमध्ये. काँग्रेस आणि भाजप सत्तेचे दावेदार म्हणवणारे हे दोन्ही पक्ष या बाजारी अर्थव्यवस्थेचे पाठीराखेच आहेत. या बाजारी अर्थव्यवस्थेमुळेच देशापुढे अनेक प्रश्न निर्माण झालेत हे सत्य मतदारांसमोर येऊ न देण्यातच त्यांचे हितसंबंध गुंतले आहेत आणि म्हणूनच त्यांना चर्चा नको आहे. देशातील सरकार हे भांडवलदारी अर्थव्यवस्थेचे समर्थन करणारे आहेच पण सरकारवर केवळ भांडवलदारी धोरणांचा परिणाम आहे हे खरे नाही तर काही भांडवलदार घराणीच सरकार चालवत आहेत. पण हे सत्य त्यांना मतदारांसमोर यायला नको आहे.

नव्याने उगवलेला आम आदमी पक्ष सुद्धा भ्रष्टाचार सोडून इतर कोणत्याच प्रश्नांची चर्चा करताना दिसत नाही. महागाई, बेकारी, विषमता, स्त्रियांवरचे लैंगिक अत्याचार, हल्ले या प्रश्नांची सोडवणूक ते कोणत्या भूमिकेच्या आधारे करणार आहेत या विषयी ते बोलताना दिसत नाहीत आणि म्हणूनच काँग्रेस-भाजप ला आम आदमी पक्ष हा पर्याय होवू शकत नाही.

डावे पक्ष दिर्घकाळ आणि आता निवडणुकांच्या काळातही अर्थव्यवस्थे संबंधी बोलताहेत कारण अर्थव्यवस्था हाच राज्य व्यवस्थेचा, समाज व्यवस्थेचा पाया आहे आणि ते बरोबरही आहे. देशा समोरच्या प्रश्नांचे मुख्य कारण हे ही बाजारी अर्थ व्यवस्थाच आहे.

विकासासाठी वाढ आवश्यकच असते पण नुसती वाढ म्हणजे विकास नव्हे. देशाचे एकूण सकल घरेलू उत्पादन वाढले आहे पण त्याच बरोबरीने विषमताही वाढत आहे. वाढलेल्या उत्पादनाचा वाटा सर्वांना मिळत नाही तर तो काही मुठभरांच्याच वाट्याला जातो परिणामता श्रीमंत अधिक श्रीमंत होतोय तर गरीब अधिकच गरीब होतोय.

आपल्या राज्यघटनेत अंतर्भूत असलेले धर्मनिरपेक्षता हे तत्त्वच ज्यांना मान्य नाही. ज्यांनी सरकारी यंत्रणेचा वापर करून गुजरातमध्ये मुस्लीमांचे शिरकाण घडवून आणले. भारताची धर्मनिरपेक्ष घटना बदलणे जमत नाही. म्हटल्यावर ज्यांनी धर्मनिरपेक्षताच नष्ट करण्यासाठी माणसुकीला काळीमा फासणारी कृत्ये पोलिस यंत्रणेच्या संरक्षणात घडवून आणली अशांच्या हाती देशाची सत्ता देणार काय? याचा विचार मतदारांनी करायला हवा मतदारांनी आता सावध राहिले पाहिजे.

मनहमोहन सिंग प्रथम पंतप्रधान झाले ते ही डाव्या खासदारांच्या पाठींब्यामुळेच. डाव्यांना मंत्रीपदे देण्यात येत असतांनाही ती मंत्रीपदे डावलून डाव्यांनी किमान समान कार्यक्रमाचा आग्रह धरला त्या आणि त्यामुळेच आदिवासींना जमिनीची मालकी देण्याचा, माहितीच्या अधिकाराचा कायदा देशभर होण्याचा, प्रॉव्हिडंट फंडावरील व्याजदर कमी न होवू देण्याचा कार्यक्रम राबवून घेतला गेला.

कॉ. इंद्रजित गुप्ता यांनी केंद्रातून गृहमंत्री म्हणून तर कॉ. चतुरानन मिश्रा यांनी शेतीमंत्री म्हणून उत्तम अशी जनहित दक्ष भूमिका बजावली होती हे आपल्याला विसरता येणार नाही.

येत्या लोकसभेमध्ये डाव्या पक्षांच्या मजबूत गट ही देशाची गरज आहे. भारतीय जनतेला सांप्रदायिकता विरोधी, भांडवलदार विरोधी, कष्टकरी समूदायाला न्याय देणारी धोरणे आणि व्यवस्था हवी आहे ते देण्याचे काम समर्थपणे भारतीय कम्युनिस्ट पक्ष व डावी आघाडीच करू शकते. म्हणूनच भारतीय कम्युनिस्ट पक्ष व डाव्या आघाडीच्या उमेदवारांना मते देण्याचे व विजयी करण्याचे आव्हान करीत आहोत.

निशाणी आहे विणा-कणिस!

जयहिंद! लाल सलाम!